


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १३५, मंगळवार ६ फेब्रुवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# पिंपरी जलसेनमध्ये मानवीवस्तीत बिबट्याचा मुक्त संचार

## वन विभागाकडून मात्र उपाययोजना नाहीत

पिंपरी जलसेन : प्रतिनिधी

**गेल्या आठ दिवसांपासून पिंपरी जलसेनच्या मानवी वस्तीमध्ये बिबट्याचा मुक्त संचार सुरू असून तक्रार करूनही वन विभागाकडून काहीही उपाययोजना करण्यात येत नसल्याचे नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पाळीव प्राण्यांबरोबरच नागरीकांवरही बिबटया हल्ले करीत असून वन विभागाच्या हलगर्जीपणाविषयी नागरीकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.**

पहाटे चार वाजण्याच्या सुमारास पत्रकार चंद्रकांत कदम यांच्या घराच्या ओटयावर बसलेल्या कुत्र्याच्या पिलास बिबटयाने उचलून नेले. त्यानंतर रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास कदम यांच्या घराजवळील जाळीतील दोन कोंबडया बिबटयाने फस्त केल्या. तेथील गाईवरही बिबटयाने हल्ला केला. घरातील व्यक्तींना चाहूल लागल्यानंतर बिबटयाने तेथून पळ काढला. बिबटयाने केलेल्या हल्ल्याच्या सर्व घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाल्या आहेत. कदम वस्तीव्यतीरिक्त पिंपरीजलसेनमधील पाळीव कुत्री, कोंबडया तसेच जनावरे यांच्यावरही हल्ले करून बिबटयाने त्यांना फस्त केल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. वन विभागास माहीती दिल्यानंतर कर्मचाऱ्यांनी भेट देण्याचा देखावा करीत उपाय योजना



■ बिबटयाच्या मुक्त संचारामुळे पिंपरीजलसेनचे नागरीक दहशतीखाली आहेत.

मात्र काहीही केल्या नाहीत.

पिंपरीजलसेनमध्ये कुठे ना कुठे बिबटयाचे दर्शन होत असल्याने नागरीकांना घराबाहेर पडणेही मुश्किल झाले आहे. शेतीसाठीची वीज रात्री असल्याने बिबटयाच्या दहशतीमुळे नागरीक रात्री शेतामध्ये जाण्याचे धाडस करीत नाहीत. परिणामी शेतांमधील पिकेही जळू लागली आहेत. बिबटयाचा हा मुक्त संचार रोखण्यासाठी वन विभागाने पिंजरा लावून त्यास जेरबंद करण्याची मागणी करण्यात येत आहे. वन विभागाकडून मात्र नागरीकांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले जात आहे. पिंजरे शिल्लक नसल्याचे कारण देत वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. पाळीव प्राण्यांचे जीव जात असताना आता माणसांच्या जीवावर बेतल्यावर वन विभाग जागे होणार का असा सवालही करण्यात येत आहे.

### पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करा

**पिंपरी जलसेनमध्ये ठराविक ठिकाणी बिबटया वारंवार संचार करीत असल्याने त्यास जेरबंद करणे वन विभागास सहज शक्य आहे. ठराविक ठिकाणी पिंजरा लावून बिबटयास जेरबंद करावे. अनेक पाळीव प्राण्यांचे आतापर्यंत जीव गेले आहेत. आता माणसांचे जीव जाण्याची वन विभाग वाट पाहत आहे का?**

**चंद्रकांत कदम, पत्रकार**

# मनोज जरांगे १० फेब्रुवारीपासून पुन्हा उपोषणाला बसणार

■ आरक्षण मिळाले तरीही गैरसमज पसरवण्याचं काम
■ जरांगेंनी विरोधकांना सुनावले खडेबोल

जालना : प्रतिनिधी

**मराठा समाजाचा अपमान होईल असे मी एकही पाऊल मी उचललेले नाही. मुंबई जाण्याच्या अगोदरही षडयंत्र रचण्यात आले होते. मला कसे बाजूला सारण्यात येईल, याचा कट रचला जातोय. काही लोकांना माझ्यामुळे आरक्षणाचा लाभ घेता आला नसल्याची टीका मनोज जरांगे पाटील यांनी केली.**

जरांगे पाटील हे आता पुन्हा एकदा १० फेब्रुवारीपासून उपोषणाला बसणार आहेत. यावेळी माध्यमांशी बोलतांना त्यांनी मराठा आरक्षणाला केवळ विरोध केला जात आहे. आम्ही कायदा बनवून आणला हे आमचे यश नाही का? मात्र तरीदेखील अनेकजण सोशल मीडियावर अफवा पसरवत



आहेत. गोरगरीबांची दिशाभूल करण्याचे काम यांच्याद्वारे केले जात आहे. त्यांनी थेट मला भेटून माझ्याशी चर्चा करावी. मी आता केवळ त्यांच्यासाठी उपोषणाला बसलो आहे, असेही मनोज जरांगे पाटील म्हणाले.

**नेत्यांकडून कटकारस्थानं**

जरांगे म्हणाले की, अनेकांना मान-सन्मान, पैसे आणि पद

उर्वरीत पान ३ वर

**TENDER NOTICE**

The Princopal , Maharaja Madhavrao Shinde college of Agriculture At-Jamgaon ,Tal-Parner Dist- A'nagar. .Invite E-tender for Construction of Temporary rooms job through the website of MKCL, https://www.edumart.sets.co.in

| Name of the work | Estimated cost in (Rs.) | Start Date | Last Date |
|---|---|---|---|
| Construction of Temporary rooms for Rayat Shikshan sanstha's Maharaja Madhavrao Shinde college of Agriculture At-Jamgaon ,Tal-Parner Dist- A'nagar. | 17,90,865/- | 30/01/2024 | 15/02/2024 |

The Principal
Maharaja Madhavrao Shinde college of Agriculture At-Jamgaon ,Tal-Parner Dist- A'nagar.
Contact no. :- 8485057025

# नमीता सांगळे, ऋषिकेश कोंगे, भास्कर शिवले यांनी पटकावला करंडक

■ अण्णासाहेब हजारे महावक्ता करंडक स्पर्धा ■ राज्यातील १२८ स्पर्धक सहभागी ■ स्पर्धेचे यंदाचे दुसरे वर्ष



■ राळेगणसिद्धी येथे झालेल्या पद्मभूषण डॉ.अण्णासाहेब हजारे महावक्ता करंडक राज्यस्तरीय वकृत्व स्पर्धात बक्षीस विजेत्यांसोबत अण्णा हजारे

पारनेर : प्रतिनिधी

**आडवाटेच पारनेर, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी व नागेश्वर मित्र मंडळ पारनेर यांच्या वतीने आयोजित पद्मभूषण डॉ. अण्णासाहेब हजारे महावक्ता करंडक वकृत्व स्पर्धा त नमीता सांगळे, ऋषिकेश कोंगे शिरूर, भास्कर शिवले पुणे यांनी पटकावला.**

राळेगणसिद्धी येथे सकाळी स्पर्धा उद्घाटन जिल्हा बँक संचालीका गीतांजली शेळके, कन्हैयाचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश पठारे, साहित्य साधना मंचचे प्रमुख संजय पठाडे,चंदन भळगट, आडवाटेचे पारनेरचे प्रमुख प्रा.तुषार ठुबे, अशोक गायकवाड, सोमनाथ चौधरी,वैभव पोटे,सपना ठाणगे, रितिका ठुबे यांच्या उपस्थितीत झाले.बक्षिस वितरण पद्मभूषण अण्णा हजारे, कारभारी बाबर, गणेश कावरे, अनिल नऱ्हे, महाबली मिसाळ, संकेत ठाणगे, सचिन गायखे,दिपक फापाळे यांच्या हस्ते झाले.

परीक्षक म्हणून हरीभाऊ चौधरी, शुभंम गाडगे, अशोक शिंदे, ज्ञानेश्वर कवाद, सुधामती कवाद, अर्चना पोटघन, आनंद पाटेकर, वैभव पठारे यांनी काम पाहिले.

स्पर्धा यशस्वीसाठी प्रा. तुषार ठुबे,अशोक गायकवाड , सोमनाथ चौधरी, वैभव पोटे, संकेत ठाणगे, सचिन गायखे, महाबली मिसाळ, अनिल नऱ्हे, वैभव गंधरे , प्रतीक्षा गुंड, अनम मुजावर ,दीपाली डोळस, स्नेहल एरंडे, अदिती शेळके ,गौरी फापाळे ,वैशाली घुमटकर,, कृतिका तिकोणे, पुजा शिंदे यांनी प्रयत्न केले.

**स्पर्धेचे निकाल**

प्राथमिक गट -नमिता सांगळे, वेदांती येवले,रेनवडी, अवनी चेमटे, भाळवणी, प्रियल झावरे, टाकळी ढोकेश्वर,सिद्धी शिंदे, राळेगणसिद्धी, विराज ठुबे, कान्हुरपठार, माध्यमिक

उर्वरीत पान ३ वर












# युवा


## लग्नाच्या नावाचीही भिती!



**अभिनेत्री फातिमा सना शेखने भलेही बॉलिवूडमध्ये फक्त दोनच सिनेमे केले असतील, पण तरीही तिच्या बोल्ड अंदाजामुळे ती सतत चर्चेत असते. असंच काहीसं पुन्हा एकदा पाहायला मिळालं जेव्हा तिने लग्नासारख्या विषयावर मनमोकळेपणाने आपलं मत मांडलं.**

### अॅडजस्ट करणं

मुलगी कितीही शिकलेली असुदेत पण लग्नानंतर तिला संसार कधीच चुकत नाही. संसारातील काही गोष्टी तिला मन लावून पूर्ण कराव्या लागतात. संसार, संसारातील लोक सारे तिची जबाबदारी असतात. कर्तव्य पार पाडली नाही तर समाज व कुटुंबीय दोघांच्या नजरेत तिची प्रतिमा ढासळू शकते. घराला बांधून ठेवण्यासाठी बहुतांश वेळा मुलींना आपल्या स्वप्नांची तिलांजली द्यावी लागते. प्रत्येक गोष्टीत अॅडजस्टमेंट करुन जगावं लागतं. कुठे १९/२० असेल तर समजून घ्यावं लागतं. हे मान्य नसेल तर मुली थेट लग्न न करण्याचाच निर्णय घेतात.



आता तो काळ गेला, जेव्हा लग्नालाच मुली आपल्या आयुष्याचा आधार मानायच्या. आता काळ बदलतोय, लोकांचे विचार बदलतायत व नाती निभावण्याची पद्धतही आता बऱ्याच अंशी बदलली आहे. आजकालच्या मुली लग्न करून संसार करणं हेच आपल्या जीवनाचं उद्दिष्ट आहे असं अजिबात मान्य करत नाहीत. हल्लीच्या मुली लग्नबंधनात बांधल्या जाण्याआधी लहानात लहान गोष्टीचाही बारकाईने विचार करतात. हेच काहीसं मत अभिनेत्री फातिमा सना शेखने हिचंही आहे. ती स्वतःला जबरदस्ती लग्नाच्या नात्यात ढकलू इच्छित नाही. एका मुलाखतीत ती स्वतः म्हणाली की, लग्नावर विश्वास नाही म्हणून तिला कधीच लग्न करायचं नाही. फातिमाचं म्हणणं आहे की, जर तुम्हाला खरंच एखाद्या व्यक्तीसोबत आयुष्य व्यतीत करण्याची इच्छा असेल तर तुम्हाला एखाद्या कागदावर नातं पक्कं करण्याची गरज नसते. फातिमा म्हणते, मी खूप खुल्या विचारांची आहे आणि लग्न माझ्या खुल्या विचारांवर व स्वातंत्र्यावर गदा आणतं. फातिमा अशी पहिली मुलगी नाही जी लग्नाची तुलना स्वातंत्र्याशी करते आहे, तर आज समाजातील बहुतांश मुलींना हेच वाटतं की लग्नानंतर त्यांचं स्वातंत्र्य संपून जाईल. पण मंडळी, ही गोष्टही नाकारता येऊ शकत नाही की, जोडीदार चांगला असेल तर पहिल्या आयुष्यापेक्षाही जास्त आनंद लग्नानंतर मुली लुटू शकतात. पण लग्नाची स्वातंत्र्यासोबत तुलना करणं नुकसानाशिवाय काहीच देत नाही.

### स्वातंत्र्य धोक्यात

बहुतांश मुलींचं असं मत असतं की, जोपर्यंत त्या कोणत्या नात्यात बांधल्या जात नाहीत तोपर्यंत त्या एखाद्या खुल्या पक्ष्याप्रमाणे स्वतंत्र असतात. या काळात त्या त्यांना हवं ते करु शकतात. लग्नानंतर मात्र या गोष्टी बदलतात. कारण लग्नानंतर जे काही करणार त्यात पती व सासरच्या मंडळींचा सल्ला घेणं आवश्यक आहे असं या मुलींचं म्हणणं असतं. या बंधनांपासून बचाव करण्यासाठी देखील बऱ्याच मुली लग्न न करण्याचा निर्णय घेतात.

### अंकुश ठेवणं

काही मुली यासाठीही लग्नापासून दूर पळतात कारण त्यांना स्वतःवर व विचारांवर अंकुश ठेवलेलं किंवा अडवणूक केलेली आवडत नाही. त्यांना असं वातावरण मिळालं नाही की, ज्यामध्ये त्या हवं ते बिनदिक्कतपणे करु शकतात तर त्यांची कोंडी होऊ लागते. असे कपडे घालू नकोस, मित्रमैत्रीणींसोबत फिरायला जाऊ नको, 'असं वागू नको, तसं वागू नको' या गोष्टींपासून दूर राहण्यासाठी स्त्रिया लग्नाच्या निर्णयापासून दूर राहणंच पसंत करतात.

### करियरचा शेवट

बहुतेक मुलींना असं वाटतं की, लग्न केल्यास त्यांच्या महत्त्वकांक्षा व करियर संपुष्टात येईल. लग्न तोपर्यंत ठीक आहे जोपर्यंत मुलींना आपलं शहर किंवा देश सोडावा लागेल. पण लग्नासाठी आपल्या करियरचा शेवट हे मुलींना कदापि मान्य नसतं. एखाद्या नव्या शहरात लग्न करुन जा आणि तिथे पहिल्यासारखी चांगली नोकरी शोधा हे बोलण्याइतकं सोपं नाही हे त्या चांगलंच समजतात. त्यामुळे करियरला प्राधान्य देणा-या मुली लग्नाचा विचार मागे टाकतात.

### शिष्टाचार किंवा अटी

सर्वच मुलींना ही भीती असते की एकदा का त्या लग्नबंधनात बांधल्या गेल्या की त्यांच्यावर अटी व शिष्टाचार लादले जातील. स्वतःवर कमी खर्च करुन घरासाठी पैसे साठवणं, घरातील मंडळींसाठी पैसे खर्च करणं, मुलांना सांभाळण्यासाठी नोकरी सोडून घरी राहणं, सासू-सासरे व पतीची यथायोग्य काळजी घेणं हे सारं काही त्या अटी-अपेक्षांमध्ये येतं. असं मर्यादीत जीवन हल्लीच्या मुलींना आवडत नाही.




# कमी वयाची मुलगी, जास्त वयाचा मुलगा... नातं यशस्वी होतं का?

# उत्तर आहे 'होय!'

**लग्न जुळवताना मुलगा आणि मुलगी या दोघांच्या घरची एकच अट असते की दोघांच्या वयात जास्त अंतर नसावे. सामान्यतः मुलाचे वय जास्त असेल आणि मुलीचे कमी तर मुलीच्या घरचे नकारच देतात. अर्थात त्या मागे त्यांची स्वतःची सुद्धा काही कारणे असतात. वयात जास्त अंतर असेल तर तो व्यक्ती आपल्या मुलीला लवकर सोडून स्वर्गवासी होईल ही सर्वात मोठी भीती मुलीच्या घरच्यांना असते. शिवाय वय जास्त असल्याने समाजातील मान राखण्याचा प्रश्न सुद्धा निर्माण होतो.**





नातेवाइक नावं ठेवण्याची शक्यता असते. पण या सर्व गोष्टी आपण बाजूला ठेवल्या आणि कमी वयाची मुलगी आणि जास्त वयाचा मुलगा यांच्या केवळ नात्याचा विचार केला तर ते नातं कितपत यशस्वी होत असेल? तर मंडळी या प्रश्नाचे उत्तर आहे होय अशी नाती यशस्वी होतात आणि सुखाचा संसार करतात. जास्त विचार करण्याची गरज नाही, तुम्हाला कित्येक प्रसिद्ध बॉलिवूड कपल्सची उदाहरणे सहज दिसतील. आज त्याच कपल्स बद्दल आपण जाणून घेऊया...

### ◗ रितेश आणि जेनेलिया

बॉलिवूडमधील सर्वात हॅप्पी कपल म्हणून या दोघांकडे पाहिलं जातं. ना कधी त्यांच्या भांडणाची बातमी येते, ना कोणत्या वादाची, गेली कित्येक वर्षे दोघांचा संसार सुरळीत सुरू आहे दोघांमध्ये 7 वर्षांचे अंतर असून सुद्धा! हो रितेश हा जेनेलियापेक्षा सात वर्षांनी मोठा आहे. पण वयाच्या या अंतरामुळे कुठेच त्यांच्या नात्यात अंतर आले नाही. अर्थात याचं श्रेय ज्या दोघांनाच जातं कारण त्यांनी ते नातं सांभाळलं आहे. त्यांच्या नात्याची खास गोष्ट म्हणजे ते कधीच आपल्या नात्यातील रोमान्स कमी होऊ देत नाहीत. नेहमी एकमेकांशी प्रेमाने वागतात आणि आपलं नातं सुंदर राखण्याचा प्रयत्न करतात.

### ◗ शाहीद आणि मीरा

शाहीद आणि मीरा यांचं लग्न किती अचानक झालं हे सर्वांनाच ठाऊक आहे. अनेकांना वाटत होतं की शाहीद कोणत्या तरी बॉलिवूड अभिनेत्री सोबतच लग्न करेल, पण सर्वांच्या अंदाजाला दूर सारत त्याने निवड केली मीरा राजपूतची जी त्याच्या पेक्षा 1 किंवा 2 नाही तर तब्बल 14 वर्षे लहान आहे. पण कुठेच या गोष्टीचा त्यांच्या नात्यावर प्रभाव दिसून येत नाही. त्यांच्या नात्याचं एक गुपित म्हणजे दोघांनी एकमेकांना बॉलिवूडच्या दिखाव्यापासून दूर ठेवलं आहे. मीरा तर फार कधी कॅमेऱ्यासमोर येत नाही आणि शाहीद सुद्धा केवळ चित्रपट प्रमोशन वगळता अन्य वेळी कॅमेरा पासून दूरच राहतो. दोघेही शक्य तेवढा वेळ आपल्या संसाराला देतात आणि खुश राहतात.

### ◗ सैफ आणि करीना

या लिस्टमध्ये या जोडीचं नाव नाही असं कसं होईल, कारण नेहमी चर्चेत राहणारी अत्यंत प्रसिद्ध आणि वयात मोठं अंतर असणारी दोघांची जोडी आहे. करीना सैफ अली खानपेक्षा 10 वर्षे लहान आहे मात्र तरी तिने स्वतःच्या मर्जीने सैफचा पती म्हणून स्वीकार केला कारण तिचं खरंच त्याच्यावर प्रेम होतं. दोघांचं एकमेकांवर असलेलं हे गोड प्रेम नेहमी लहान सहन गोष्टीतून देखील दिसत असतं. या दोघांनी दाखवून दिलंय की जर प्रेम खरं असेल तर व्हायला बंधन नाही. तुम्ही कोणत्याही व्यक्ती सोबत खुश राहू शकता. त्यांचे विचार सुद्धा अत्यंत आधुनिक असून ते पती पत्नी कमी व मित्र मैत्रीण या नात्याने एकमेकांसोबत जास्त वागतात.

### ◗ अजय आणि काजोल

ही गोष्ट फार लोकांना माहीत नाही पण हे खरे आहे की अजय देवगण आणि काजोल या दोघांच्या वयातही मोठे अंतर आहे, मात्र दोघांकडे पाहून अजिबात या गोष्टी वर विश्वास बसत नाही कारण त्यांचे एकमेकांवर प्रेमच तितके अफाट आहे. दोघांच्या संसाराला आता 20 वर्षांपेक्षा जास्त काळ लोटला आहे मात्र आजही त्यांचे नाते सदाबहार आहे. त्यांच्या लग्नावेळी अनेकांनी त्यांचे हे नाते कितपत टिकेल यावर शंका व्यक्त केली होती मात्र दोघांनी आपला संसार यशस्वी करून दाखवला आणि सिद्ध केले की प्रेमात सारं काही शक्य आहे फक्त इच्छाशक्ती हवी. त्यांचे हे प्रेमळ नाते वयात अंतर असून सुद्धा आयुष्यभर साथ देऊ इच्छिणाऱ्यांसाठी आदर्श आहे.





# ...म्हणून त्या सर्वांपेक्षा उजव्या!

**हाऊस वाइफ, गृहिणी, होममेकर काहीही म्हणा पण या स्त्रिया आपल्या घराला सर्वात जास्त आणि पहिलं प्राधान्य देताना दिसून येतात. गृहिणी इतर कोणापेक्षाही कमी नसतात. त्यांचं होम मॅनेजमेंट इतकं मजबूत असतं की भल्या भल्या लोकांना त्यापुढे घाम फुटतो. गृहिणी घराची शोभा, लक्ष्मी, सुख-शांती सारं काही असतात. त्यांच्याविना घरातील आनंद कायम अपुरा असतो. म्हणूनच म्हटलं जातं ना की, घरातील लक्ष्मी खुश तर संपूर्ण घर खुश...**

बऱ्याचदा बोलता बोलता नकळतपणे आपण बोलून जातो की, "तू तर दिवसभर घरी असतेस, तुला काय कामं आहेत, तुला साधं जेवण धड बनवता येत नाही का, घरात साफसफाई ठेवता येत नाही का?" असं आपण अगदी सहज बोलून जातो, पण जेव्हा ती जेव्हा घरात नसते आणि या जबाबदाऱ्या आपल्यावर पडतात, तेव्हा मात्र तिच्या कष्टांची किंमत आपल्याला समजते. अशा अनेक गोष्टी आहेत ज्यात गृहिणी इतर सर्वांपेक्षा उजव्या असतात पण आपल्याला ते ठाऊकच नसते. आज आपण त्याच खासियतींबद्दल जाणून घेणार आहोत ज्याची तुलना कोणाशीच होऊ शकणार नाही.

- टाइम मॅनेजमेंट : सकाळचा पहिला गरमा गरम वाफाळलेल्या चहापासून रात्रीच्या हळदीच्या दुधापर्यंत सारं काही ती अगदी चोखपणे सांभाळते. वर्किंग लोकही इतक्या हुशारीने टाईम मॅनेजमेंट करू शकत नाहीत जितक्या शिताफीने गृहिणी संपूर्ण घर सांभाळतात. ती फक्त स्वतःच्याच नाही तर कुटुंबातील सदस्यांच्या शेड्यूलवरही बारकाईने लक्ष देते व अगदी त्यात माहीर असते. जसं की, मुलांना शाळेत सोडण्यासाठी कधी तयार करायचं आहे, सासू-सास-यांना नाश्ता व औषधं कधी द्यायची? या सर्व गोष्टी ती एखाद्या एक्सपर्ट्ससारखी मॅनेज करते.
- मनी मॅनेजमेंट : मनी मॅनेजमेंट अर्थात पैशांचं व्यवस्थापन यामध्ये तर गृहिणींचा कोणी हातच पकडू शकत नाही. मिळणाऱ्या संपूर्ण पैशांमध्ये महिन्याभराचा खर्च कसा भागवायचा व त्यातूनच कशी बचत करायची याबाबत त्यांचं डोकं ज्याप्रकारे चालतं ते पाहून भल्या भल्यांना आश्चर्य वाटेल. त्यासोबतच एखादी गोष्ट योग्य दरात खरेदी करणं गृहिणींना बरोबर जमतं. त्यांच्यातील ही खासियत तेव्हा दिसून येते जेव्हा त्या खरेदीसाठी बाजारात जातात.
- नियोजन : एखादा सण येणार असेल तर कधी खरेदीला जायचं आहे व कोणत्या स्पेशल डिशेस बनवायच्या आहेत? किंवा कोणाचा वाढदिवस असल्यास कशी पार्टी ठेवायची आहे? कोणाला निमंत्रण द्यायचं, कोणाला नाही? या सर्व गोष्टी ती एकदम सहजपणे प्लान करू शकते. शिवाय हॉलिडे ट्रिपवर जायचं असल्यास पॅकिंग, पैसे किती लागणार यापासून तिथे कोणकोणत्या गोष्टींची गरज भासेल ते आठवणींनी घेणं किंवा प्लान करणं त्यांना बरोबर जमतं.
- मनमोकळा स्वभाव : या गृहिणी मनमोकळ्या स्वभावाच्या असतात. कुटुंबासोबतच शेजारीपाजरी, भाजीवाला, किराणा मालवाला ते गार्ड यांच्याशी देखील त्यांची चांगली ट्युनिंग जमते. ज्यामुळे त्यांना कोणत्याही क्षणी लगेच मदत मिळते. सर्वांशी मिळून मिसळून राहिल्याने त्यांना आजुबाजूला घडणा-या सर्व गोष्टींची माहिती असते ज्याचा फायदा त्यांच्या कुटुंबाला होतो. हाच मनमोकळा स्वभाव बार्गेनिंग करतानाही त्यांच्या कामी येतो. फिक्स रेटचा ठेका घेऊन बसलेले महागडे दुकानदारही आपुलकीने त्यांना वस्तू कमी किंमतीत देतात.



- निरीक्षण : कित्येकदा कुटुंबातील सदस्य ज्या गोष्टीचा अंदाजही बांधू शकत नाहीत ते या गृहिणींच्या नजरा पहिलंच हेरतात. साधारणतः कामाच्या व्यापात लोक असा विचार करतात की, आपल्याला काय करायचं आहे? पण गृहिणी थोडा वेगळा विचार करतात आणि प्रत्येक गोष्टींचं अगदी बारकाईने व काळजीपूर्वक निरीक्षण करतात. इतकंच काय तर लोकांच्या एक्सप्रेशन्सवरुनही त्या ओळखतात की त्यांच्या मनात काय दडलंय? त्यामुळे त्यांच्यापासून काही लपवणं फार कठीण गोष्ट असते.

## शॉर्ट न्यूज

### सहा लाख मेट्रिक टन ऊस गाळप

■ **संगमनेर :** काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते, माजी महसूलमंत्री, आमदार बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली देशातील सहकारासाठी दीपस्तंभ ठरलेल्या संगमनेर येथील सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने दुष्काळी परिस्थिती असतानाही सन २०२३-२४ या हंगामात सहा लाख मेट्रिक टन उस गाळपाचा टप्पा पार केला असल्याची माहिती कारखान्याचे चेअरमन व राज्य सहकारी साखर संघाचे उपाध्यक्ष बाबासाहेब ओहोळ यांनी दिली आहे.

### पिंपळगाव पिसा-घारगाव रस्ता काम बंद पाडले

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील पिंपळगाव पिसा ते घारगाव रस्त्याचे काम सुरू आहे. हे काम ठेकेदाराकडून अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले जात असल्याचा आरोप करत नागरिकांनी रस्ता काम बंद पाडले. दरम्यान, घारगाव-पिंपळगाव पिसा या रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून रखडले होते. या रस्त्याचे काम सुरू झाल्यावर नागरिकांनी समाधान व्यक्त केले होते. मात्र ठेकेदाराकडून या रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले होते. साईडपट्यांवर मुरुमाऐवजी माती टाकली जात असल्याचे पाहून शिंदे व पंदरकर यांनी या रस्त्याचे काम बंद पाडले.

### युद्ध सरावामुळे मुळा धरणाला धोका

■ **राहुरी :** के. के. रेंज येथे सुरू असलेल्या युद्ध सरावामुळे राहुरीतील मुळा धरणाला धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. राहुरी शहरासह ग्रामीण भागात के. के. रेंज येथे सुरू असलेल्या युद्ध सरावामुळे प्रचंड तीव्रतेचे धक्के जाणवत आहे. या धक्क्यांचा बालकांना व वयोवृद्धांना देखील त्रास होत आहे. मुळा धरणाच्या भिंतीला तडे जाऊन जर धरण फुटले तर लाखो लोकांचे जीव जाण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन के. के. रेंज युद्ध सराव बंद करावा. अशी मागणी निवेदनाद्वारे संजय संसारे यांनी केली आहे.

### रुपेश ढवण यांनी घेतली शरद पवारांची भेट

■ **पारनेर :** राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांची युवा नेते रुपेश ढवण यांनी पुणे येथे भेट घेतली. यावेळी त्यांनी विविध विषयांवर चर्चा केली. ढवण यांच्यासमवेत यावेळी त्यांचे चिरंजीव राजवीर, अक्षय भाकरे तसेच कार्यकर्ते उपस्थित होते. ढवण म्हणाले, शरद पवार पुण्यात येणार आहेत तुम्हाला त्यांना भेटता येईल असा निरोप राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष कार्यालयाकडून आला. शनिवारी पुणे येथील मोतीबाग येथे पवार यांची भेट झाली. यावेळी त्यांच्याबरोबर विविध विषयांवर चर्चा केली.

### पुणतांब्यात कुणबी प्रमाणपत्र माहिती कॅम्प

■ **पुणतांबा :** महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून सुरू असलेल्या कुणबी जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्राची जुळवाजुळव करण्यासाठी माहिती मार्गदर्शन कॅम्प आयोजित करून उपस्थित लाभार्थी नागरीकांना माहिती देण्यात आली, असे पुणतांबा मंडल अधिकारी के. एन. आदीक यांनी स्पष्ट केले. कुणबी जात प्रमाणपत्र देण्याच्या उद्देशाने विविध माहितीचे पुरावे संकलन करून ग्रामपंचायत कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनासाठी ठेवण्यात आलेले आहे.

# इनामगावच्या सिध्देश्वर मंदिरास क वर्ग तीर्थक्षेत्र दर्जा !

## ग्रामस्थांच्या अनेक वर्षांच्या मागणीला यश



**शिरुर : प्रतिनिधी**

**शिरुर तालुक्यातील इनामगाव येथील ग्रामदैवत श्रीसिद्धेश्वर मंदिर देवस्थान हे क वर्ग तीर्थक्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. या देवस्थानला तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळावा अशी ग्रामस्थांची अनेक दिवसांची मागणी होती अखेर क वर्ग तीर्थक्षेत्राची मागणी पूर्ण झाल्यामुळे ग्रामस्थांनी आनंद व्यक्त केला.**

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या इनामगावचे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर मंदिर हे महाराष्ट्रातील जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. या मंदिराची रचना हेमांडपंती असून,मंदिरातील अतिप्राचीन पूर्व-पश्चिम स्थापित दुर्मीळ असे शिबलिंग आहे. तसेच दक्षिण वाहिनी घोड नदीच्या पवित्र तीरावर स्थापित मंदिराला अनन्यसाधारण महत्त्व आहे.

### इनामगावला अभ्यासकांच्या दृष्टीने वेगळे महत्त्व !

**घोड नदीतीरावर सन १९६७ ते १९८२ च्या कालखंडात उत्खनन झाले. वसाहतीचे अवशेष, मातीची भांडी, हत्यारे, अवजारे या ठिकाणी आढळली. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील पहिल्या शेतीला कालव्यातून पाणी देण्याची पद्धत, स्वस्तिक कला आदी येथे मिळून आले. त्यामुळेच इनामगावला अभ्यासकांच्या दृष्टीने वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. आता येथील सिद्धेश्वर मंदिरास क वर्ग तीर्थक्षेत्राचा दर्जा मिळाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.**

**– तुकाराम मचाले**
**ग्रामसंस्कृती अभ्यासक**

त्यामुळे वर्षभर लाखो भाविक या मंदिरात दर्शनासाठी येत असतात.

गेल्या अनेक दिवसांपासून क दर्जाचे तीर्थक्षेत्र व्हावे, यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार, तत्कालीन पालकमंत्री चंद्रकांत पाटील, दिवंगत माजी खासदार गिरीश बापट, दिवंगत माजी आमदार बाबूराव पाचर्णे, आमदार अशोक पवार यांच्याकडे ग्रामस्थांनी अनेकवेळा मागणी केली होती.सध्या मंदिराच्या प्रांगणात विविध शासकीय योजना तसेच ग्रामपंचायत व लोकसहभागातून विकासकामे सुरू आहेत. क वर्ग तीर्थक्षेत्राची मागणी पूर्ण झाल्यामुळे ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण आहे, असे माजी सरपंच पल्लवी घाटगे यांनी सांगितले.

मंदिरालगत विविध प्रकारची झाडे लावली आहेत. पेव्हिंग ब्लॉक, कॉंक्रिटीकरणही केले आहे. स्मशानभूमी, पूलबांधणी, अंतर्गत विद्युतीकरण, संरक्षित भिंत, ओढा, खोलीकरण आदी कामे झाली आहेत. उपसरपंच सुरज मचाले, श्रीगोंदा कारखान्याचे माजी संचालक विजयसिंह मोकाशी, घोडगंगा सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक दिलीप मोकाशी, मंगल मस्के, तात्यासाहेब मचाले, शिवाजी मचाले, गणेश लोणकर, संजय घाटगे, अमोल राऊत, अभिजित मचाले, शांताराम मनवरे आदी या वेळी उपस्थित होते.

## वाचकांच्या लेखणीतून

### मथळे! मथळे!!

**आपके नाम से ताबिदा है उनवाने हयात।**
**और कुछ बात नहीं थी मेरे अफ़्साने में।।**

सलीम गीलानी म्हणतात, माझे जगणे तुझ्या नावामुळेच प्रकाशमान आहे. यापेक्षा माझ्या कहाणीत विशेष असे काहीच नव्हते.

मथळा म्हणजेच लेखाचे किंवा बातमीचे नाव किंवा हेडिंग. वृत्तपत्रात मथळ्याला फार महत्त्व असते. शितावरून भाताची परीक्षा म्हणतात तसे एखाद्या बातमीचा, लेखाचा किंवा अग्रलेखाचा मथळा वाचून त्या त्या लेखाचा चेहरा मोहरा, रागरंग वा अंतरंग वाचकाला थोडक्यात कळते आणि त्या उत्सुकतेपोटीच तो लेख वाचतो. हरवले म्हणून सापडले! हिंदूंच्या पालखीला मुस्लिमांचा खांदा (पारनेर दर्शनमधील ७.७.२३ चा माझा लेख) हे लेखांचे मथळे, माझ्या ढुंगणाला शेण लावा; पण मला बैल म्हणा! उजाडले;




पण सूर्य कोठे आहे? (लो. टिळक) हे अग्रलेखांचे मथळे, माणूस कुत्र्याला चावला, रस्त्याच्यासाठीची लढाई रस्त्यावरच! हे बातम्यांचे मथळे पाहिले म्हणजे आपली खात्री नक्कीच होईल, यात शंका नाही!

**नाना ढवळे**
**८२८६९१३२२३**
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

# अत्याधुनिक उपचार व डॉक्टरांच्या अथक प्रयत्नांनी असाध्य आजारावर रुग्णाची मात!

## श्रीगणेशा हॉस्पिटलने साधली किमया



**शिरूर : प्रतिनिधी**

**प्रगत अत्याधुनिक उपचार तसेच डॉक्टरांनी घेतलेले अथक परिश्रम यामुळे असाध्य आजारावर रुग्णाला योग्य उपचार देत तब्बल १९ दिवस व्हेंटिलेटर वर ठेवून ही रुग्णाला बरे करण्याची किमया शिरूर येथील श्रीगणेशा हॉस्पिटलने साधली आहे.**

याबाबत सविस्तर माहिती अशी की, सोमा टोपोनो (वय.२३, रा.सध्या आमदाबाद फाटा, मुळ रा. कोलकाता) या रुग्णाला गंभीर अवस्थेत (दि.१४) जानेवारी रोजी श्री गणेशा हॉस्पिटल येथे उपचारांसाठी दाखल करण्यात आले होते.यावेळी हॉस्पिटल मध्ये दाखल करत असताना रुग्णाला हातपाय हलवता येत नव्हते. शरीर ताठरलेले अवस्थेत,कमरेखाली प्रचंड वेदना,तोंड उघडत नव्हते परिणामी बोलता येत नव्हते. श्वास घेण्यास अडचणी येत होत्या.आदी गंभीर स्वरूपात लक्षणे असताना रुग्णाला दाखल केले असताना डॉक्टरांना नेमके निदान करणे आवश्यक होते.यावेळी सर्व आवश्यक तपासण्या केल्या असता रुग्णास धनुर्वात मधील दुर्धर आजाराचे निदान झाले.

धनुर्वात हा आजार अतिशय दुर्मिळ असा असून भारतात मागील वर्षी ५८ रुग्णांची नोंद आढळून आली आहेत तर सन २०१९ मध्ये जगभरात ७३ हजार रुग्ण सापडले असून त्यांपैकी ४८ हजार रुग्ण दगावल्याची नोंद आहे. लहान मुले ते धनुर्वात लस न घेतलेले रुग्ण याची शिकार होत आहे.

श्री गणेशा हॉस्पिटल येथे रूग्ण दाखल केल्यानंतर स्वतंत्र आयसोलेशन वॉर्ड मध्ये ठेवण्यात आले.रुग्णाला कुठलाही त्रास होऊ नये म्हणून या वॉर्ड मध्ये प्रकाश विरहित व आवाज येणार नाही याची विशेष काळजी घेण्यात आली. टिटॅनसइम्युनोग्लोब्युलिन हे इंजेक्शन भारतात कमी प्रमाणात उपलब्ध असताना त्यास मागवून घेऊन त्या इंजेक्शन मधील औषधाचा काही भाग मनक्यात व मांसपेशीत देण्यात आला.सातत्याने रुग्णावर लक्ष ठेवण्यात आले. ज्या ठिकाणी जखम आहे त्याची विशेष काळजी घेण्यात आली. सुमारे १९ दिवस रुग्णाला कृत्रिम श्वसन यंत्रणा (व्हेंटिलेटर) वर ठेवण्यात आले.

सध्या रुग्णाची प्रकृती उत्तम असून कृत्रिम श्वसन यंत्रणा (व्हेंटिलेटर) बंद करण्यात आले असून रुग्ण स्वतः श्वास घेत आहे. प्रगत अत्याधुनिक उपचार पद्धती व श्री गणेशा हॉस्पिटलचे डॉक्टर व स्टाफ ने घेतलेल्या मेहनतीमुळे दुर्धर आजारावर मात करत रुग्नास वाचविण्यात यश आले आहे.

याविषयी माहिती देताना हॉस्पिटलचे संचालक डॉ.अखिलेश राजुरकर व संचालक डॉ.विशाल महाजन यांनी सांगितले की,वैद्यकीय तंत्रज्ञान विकसित होत असताना संपूर्ण करिअर मध्ये अशा प्रकारचा रुग्ण प्रथम पहावयास मिळाला असून त्यावर अचून निदान,योग्य उपचार दिल्याने दुर्मिळ आजारावर इलाज करता आला आहे.या साठी हॉस्पिटलचे अतिदक्षता विभागाचे तज्ञ डॉ. सारंग पाठक, डॉ.सौरभ पाठक, डॉ.सागर केदारे डॉ.अक्षय काळे, डॉ. संतोष पठारे,डॉ. अभय घोडेकर, डॉ.सुमित रोकडे, डॉ.शुभम घोडे, फिजिओथेरपिस्ट डॉ. पूनम केंदळे, सुरज खरात,शिल्पा झंजाड,शुभांगी गावडे,मोनिका गायकवाड,प्रेतीना मोची,आशिकेश शेळके,शीतल पोकळे,वैशाली पडवळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

या विषयी अधिक माहिती देताना आमदाबाद येथील मंगेश थोरात व राहुल थोरात यांनी सांगितले की, श्रीगणेशा हॉस्पिटल ने सामाजिक बांधिलकी जपत रुग्ण दाखल केल्यानंतर उपचार केलेच परंतु महागडी औषधे देखील बाहेरून मागवली.रक्ताचे नाते नसताना ही आमदाबाद ग्रामस्थ, व श्री गणेशा हॉस्पिटलने दाखविलेल्या तत्परतेमुळे रुग्णाचे प्राण वाचले असल्याचे भावना त्यांनी व्यक्त केली.

# कौशल्य विकासाद्वारे नवी पिढी निर्माणाचा संकल्प करा

## महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

**नगर : प्रतिनिधी**



**आजचे विद्यार्थी हे उद्याच्या उज्ज्वल देशाचे भविष्य आहेत. कौशल्यावर्धित शिक्षणामध्ये उद्याचे भविष्य आहे. उद्याच्या विकसित भारतामध्ये कौशल्य विकासाद्वारे नवी पिढी निर्माणाचा संकल्प करा, असे आवाहन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.**

जाधव लॉन्स येथे जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग व जिल्हा गणित विज्ञान अध्यापक संघ नगर यांच्या संयुक्त विद्यमाने ५१ वे जिल्हास्तरीय विज्ञान गणित व पर्यावरण प्रदर्शन सन २०२३-२४ पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विखे पाटील बोलत होते. जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आदी उपस्थित होते. मंत्री विखे पाटील म्हणाले, गेल्या पन्नास वर्षांपासून जिल्ह्यात अशा प्रकारचे प्रदर्शन भरवण्यात येत आहे. शिक्षकांनी दिलेल्या प्रोत्साहनामुळे विद्यार्थ्यांमधील संशोधक व चिकित्सक वृत्तीला वाव मिळून आत्मविश्वासाने या विद्यार्थ्यांनी नवनवीन उपकरणे सादर केली आहेत. परंतु, आजच्या आधुनिकतेच्या युगातनवीन बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचा उपयोग या उपकरण निर्मितीसाठी व्हावा,अशी अपेक्षाही मंत्री विखे पाटील यांनी व्यक्त केली.

# नगर तालुका खरेदी विक्री संघाची निवडणूक बिनविरोध; शिवाजीराव कर्डिले गटाचीच पुन्हा सत्ता

**नगर : प्रतिनिधी**

**नगर तालुक्यात राजकियदृष्ट्या अत्यंत महत्वाच्या समजल्या जाणाऱ्या नगर तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीसाठी दाखल झालेले उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी सोमवारी (दि.५) दुपारपर्यंत विरोधी महाआघाडीच्या सर्व उमेदवारांनी आपले अर्ज मागे घेतल्याने संघाची १७ जागांसाठी १८ फेब्रुवारीला होणारी निवडणुक बिनविरोध झाली आहे. त्यामुळे संघावर पुन्हा एकदा जिल्हा बँकेचे अध्यक्ष शिवाजीराव कर्डिले गटाची सत्ता आली आहे.**

या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दि. १२ ते १८ जानेवारी या कालावधीत १७ जागांसाठी ५९ उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. छाननीत सर्व अर्ज मंजूर करण्यात आले. दाखल अर्ज माघारीची मुदत सोमवारी (दि.५) दुपारी ३ वाजेपर्यंत होती. या मुदतीत अनेकांनी माघार घेतल्याने १७ जागांसाठी १७ अर्ज राहिल्याने ही निवडणुक बिनविरोध झाली.



बिनविरोध झालेले उमेदवार पुढीलप्रमाणे
सहकारी संस्था प्रतिनिधी मतदार संघ (जागा १०)
दत्तात्रय बबनराव नारळे, अशोक दशरथ कामठे, अजिंक्य वाल्मिक नागवडे, संजय अप्पासाहेब धामणे, भारत गोपीनाथ फालके, संजना विठ्ठल पठारे, डॉ. राजेंद्र सूर्यभान ससे, आसाराम दशरथ वारुळे, मंगेश ठकाजी बेरड, बाबासाहेब सदाशिव काळे.
व्यक्तिगत मतदार संघ (जागा २) रावसाहेब मारुती शेळके, मिनीनाथ एकनाथ दुसुंगे.
महिला राखीव मतदार संघ (जागा २) मंगल लक्ष्मण ठोकळ, मीना बाळासाहेब गुंड.
इतर मागास प्रवर्ग (जागा १)- उत्कर्ष बाळासाहेब कर्डिले.
अनुसूचित जाती जमाती प्रवर्ग (जागा १)- जीवन भाऊसाहेब कांबळे.
वि.जा.भ.ज. प्रवर्ग (जागा १) - संतोष अर्जुन पालवे.

# छगन भुजबळ यांचा बोलवता धनी वेगळा

## सकल मराठा समाजाचा आरोप

**नगर : प्रतिनिधी**

**ओबीसी नेते छगन भुजबळ हे केवळ सुपारी घेऊन समाजात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न करत आहेत. त्यांनी कुणाकडून सुपारी घेतली आहे, हे सगळ्या महाराष्ट्राला माहीत आहे. त्याचा बोलवता धनी वेगळा आहे. अनाजी पंताच्या सुपारीवर छगन भुजबळ यांनी समाजात तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न करू नयेत.त्यांचेच नेते असलेले अजित पवार यांच्याकडे कुणबी प्रमाणपत्र आहे. मग, असे नेते छगन भुजबळ यांना कसे चालतात? यावरून छगन भुजबळ यांचा केवळ गोरगरीब मराठ्यांच्या आरक्षणालाच विरोध आहेत, असा आरोप सकल मराठा**



**समाजाचे गोरख दळवी यांनी केला आहे.**

नगरमध्ये शनिवारी ओबीसी एल्गार मेळावा झाला होता यात ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी मराठा नेते मनोज जरांगे पाटील यांच्यावर टीका केली होती. या टीकेला उत्तर देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी गजेंद्र दांगट, राम जरांगे, गिरीश भांबरे, स्वप्निल दगडे, मिलिंद जपे, परमेश्वर पाटील, किशोर शिंदे, शशिकांत भांबरे, अभय शेंडगे आदी उपस्थित होते.

(पान १ वरून)

# मनोज जरांगे १० फेब्रुवारीपासून पुन्हा उपोषणाला बसणार

हवे होते. ते त्यांना मिळालेले नसल्याने ते ही कटकारस्थाने करत आहेत. गोरगरिबांच्या लढ्याच्या विरोधात बोलत आहेत. राजकीय आणि विरोधी या दोघांची भूमिका घेणारे ही लोक आहेत. पक्षाच्या लोकांनीच यांना बोलायला सांगितले आहे. मात्र खोटं बोलून मराठ्यांचं गोरगरीबांचं वाटोळं करू नका. त्यांना जे मिळवायचं होतं ते मिळालेलं नाही म्हणून इतराचं वाटोळं करू नका.

बरेचजण हे सरकारची आणि विरोधी पक्षाची भूमिका घेऊन बोलत असतात. समाजात काहीतरी गैरसमज पसरवण्याचं काम केलं जात आहे. एकप्रकारे सोशल मिडीयावर हा ट्रॅपचं सुरू आहे. आम्ही कायदा बनवून आलो हे आमच्या आंदोलनाचं यश नाही का? असा सवालही जरांगेंनी सोशल मीडियावर लिहीणाऱ्यांना केला आहे. यापुढे जर हे नेते गप्प बसले नाहीत. तर मी त्यांच्या पक्षाच्या नेत्यांचंही नाव घेणार आहोत. त्यासोबतच त्यांच्या पक्षाचंही आम्ही नाव घेणार आहोत. त्या नेत्यांना कोण बोलायला लावतं त्या सर्वांची नावे मी येथे घेणार असल्याचं जरांगे यावेळी म्हणालेत.

**श्रेयासाठी पोटात दुखतंय**

श्रेयासाठी यांच्या पोटात दुखू लागलं आहे. मराठा समाजाचेही काही जळणारे नेते आहेत. त्यांनाही वाटतं की आपण लढलो तरी आपल्याला काही मिळालेलं नाही. यांच्या या ट्रॅपला मी घाबरत नाही. आत्तापर्यंत ५७ लाख नोंदी सापडल्या आहेत. ६० लाख गोरगरीब मराठ्यांचं कल्याण झालं आहे. हे मराठ्यांचं श्रेय आहे. ते लढले तेव्हाच त्यांना याचं यश मिळालं.

**मराठ्यांना आरक्षण नाही तर ओबीसींनाही नाही**

जरांगे म्हणाले की मराठ्यांना ओबीसीत आरक्षण दिलं जाणार आहे. त्यामुळे ते २००१ च्या कायद्यातच ते आरक्षण मिळायला पाहिजे. आपल्याला जर आरक्षण मिळालं नाही तर मग सर्वांचचं आरक्षण रद्द होणार आहे. कारण आपल्याकडे कुणबी नोंदी सापडल्या असून त्या नोंदीद्वारे आपल्याला ओबीसी आरक्षण दिलं जात आहे. ५४ लाख ओबीसींना प्रमाणपत्र दिले गेलेत. ज्यांच्या नोंदी सापडल्या त्यांच्या परिवारानेही अर्ज केल्यानंतर त्यांचेही प्रमाणपत्र मिळालेलं आहेत. आम्ही मोकळे माघारी येणार नाही. हे आम्ही आधीच सांगितलेलं होतं. भुजबळांमुळे सगेसोयऱ्यांचा अध्यादेश सरकार हे जाणूनबुजून काढत नव्हते. मुंबईकडे जात असतांना सरकारने पुण्यापासूनच काम सुरू केले होते. ज्यांच्या नोंदी सापडल्या नाहीत त्यांना नोंदींच्या आधारावर प्रमाणपत्र हवे होते. त्यासाठी आम्ही मुंबईला गेलो होतो. मराठे शांततेतंच आरक्षण घेऊन आले. १५ तारखेला कायद्यात रुपांतर होणार आहे. मराठ्यांना कायदा बनवून दाखवला हे आंदोलनाचं यश नाही का? तुम्हाला कायद्याविषयी माहिती आहे का? राजकारण्याचं ऐकून काहीही लिहीतात का? असा सवालही जरांगेंनी केला.

जरांगे म्हणाले- मी चार भिंतीत राहिलो तरी कायदाच घेऊन आलो. मी वाकडं पाऊलही टाकत नाही. त्याग करून मी ही लढाई लढतो तशी तुम्ही लढवून दाखवा, तु लोकांच्या जीवावर खाणारा आहे. पाच महिन्यांपासून एकाच जागेवर बसून आहे. तुला नेमकं काय होत. आरक्षण मिळू दे त्यानंतर तुला अंगावर घेणार.

# नमीता सांगळे, ऋषिकेश कोंगे, भास्कर शिवले यांनी पटकावला करंडक

गट, ऋषिकेश कोंगे, शिरूर, तनिष्का सोनार, शिरूर, समीक्षा भंडारी, पारनेर, सुहानी चेमटे, नगर, कृष्णा वाटेकर, शिरूर, अनुजा चेमटे, रांजणी, महाविद्यालय गट - भास्कर शिवले,एस एन डी टी विद्यालय पुणे, समीक्षा तनपुरे, इंजिनीअरिंग कॉलेज पुणे, साईराज घाटपांडे,नवलमल फिरोदिया विधी महाविद्यालय पुणे, आकाश मोहीते, न्यु आर्टस महाविद्यालय नगर,ऋषाली रोहोकले, इंपिरियल महाविद्यालय वाघोली, वैष्णवी फिसके, न्यु आर्टस महाविद्यालय नगर

# शिक्षण विभागाचा मिशन आपुलकी उपक्रम यशस्वी

## शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष संतोष खामकर यांनी केले अभिनंदन



**पारनेर : प्रतिनिधी**

**गेल्या अडीच वर्षापासून नगर जिल्ह्यात मिशन आपुलकी हा जिल्हा परिषद शाळांमध्ये समाज सहभागातून अतिशय दर्जेदार प्रयोग जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली राबवला जात आहे. जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील हा उपक्रम संपूर्ण जिल्ह्यात राबवत आहेत त्यांच्या या उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक होत आहे. शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष संतोष खामकर यांनी शिक्षण अधिकाऱ्यांना भेटून त्यांच्या कामाचे कौतुक केले.**

यावेळी शिक्षक परिषद संघटनेच्या वतीने खामकर सर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षण अधिकाऱ्यांना अभिनंदनाचे पत्र देत असे म्हटले आहे की,आपण अहमदनगर जिल्हा परिषद मध्ये रुजू झाल्या नंतर जिल्हा परिषदेच्या शाळांचा कायापालट करण्यासाठी समाज सहभागातून सुरू केलेल्या मिशन आपुलकी हा प्रकल्प खरोखर खूप प्रेरणादायी आहे या प्रकल्पाच्या माध्यमातून आतापर्यंत जिल्ह्यातील शाळांना समाज सहभागातून वस्तू रुपात व पैसे रूपात जवळजवळ अंदाजे २३ कोटी रुपये मिळालेले आहेत शाळांना भौतिक सुविधा प्राप्त होत आहेत खरोखर आपला हा प्रकल्प राज्याला प्रेरणादायी आहे आपण हा प्रकल्प राबविण्यासाठी जिल्ह्यातील सर्व प्राथमिक शिक्षकांना प्रेरणा दिल्याचेही पत्रात नमुद केले आहे.

पत्रात पुढे म्हटले की,आपला दुसरा प्रकल्प मिशन शिष्यवृत्ती या माध्यमातून जिल्ह्यातील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांची तयारीची विद्यार्थ्यांना इयत्ता तिसरीपासून संधी मिळाली यातून शाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा निश्चितच सुधारण्यास मदत झाली आहे. आपल्या कालावधीमध्ये तुम्ही पदवीधर शिक्षक ग्रेड पात्र मुख्याध्यापक केंद्रप्रमुख शिक्षण विस्तार अधिकारी यांच्या पदोन्नतीचा प्रश्न निकाली काढला अत्यंत पारदर्शीपणे सदरील प्रक्रिया पार पाडली या कामी शिक्षण विस्ताराधिकारी जयश्री कारले व अधीक्षक संभाजी भदगले यांचेही खूप सहकार्य लाभले आहे.

नगर जिल्हा परिषदेचे शिक्षण अधिकारी भास्कर पाटील यांना अभिनंदनाचे पत्र देण्यात आले. यावेळी शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष संतोष खामकर यांच्या समवेत उत्तर विभागीय अध्यक्ष शिक्षक परिषद अहमदनगर राजेंद्र पटेकर ,शिक्षक परिषद अहमदनगर सरचिटणीस दत्तात्रय गवळी ,शिक्षक परिषदेचे नेते विकास डावखरे, राजेंद्र जायभाय, दशरथ ढोले, वैजनाथ गीते हे यावेळी उपस्थित होते.

**अधिकारी/कर्मचारी उल्लेखनीय कामांची माहिती**

जिल्हा परिषद शाळांमध्ये लोकसहभागातुन भौतिक सुविधा वाढविण्यासाठी मिशन आपुलकी हा नाविन्यपूर्ण उपक्रम सुरू करण्यात महत्वाची भुमिका बजावली. जिल्ह्यातील मुळ रहिवाशी असलेले राज्यात विविध पदावर कार्यरत प्रशासकीय अधिकारी, एनजीओ, औद्योगिक कंपन्या, शिक्षणप्रेमी नागरीक यांच्या कडे शाळांना मदत मिळणेकामी सातत्याने पाठपुरावा केला. मिशन आपुलकी या नाविण्यपूर्ण उपक्रमांतर्गत शालेय वर्गखोल्या, संगणक, इंटरअॅक्टीव बोर्ड, वॉटर कुलर, बेंचेस, टॉयलेटस, फर्निचर, ई. सुविधांची निर्मिती जिल्हा परिषद शाळांमध्ये झाली.

मिशन आपुलकी अंतर्गत आतापर्यंत सुमारे २३ कोटी रु.च्या भौतिक सुविधा जिल्ह्यातील शाळांमध्ये निर्माण झाल्या आहेत.

समग्र शिक्षा योजनेकरीता राज्यस्तरावर पाठपुरावा करून जिल्हा मुख्यालय व सर्व तालुकास्तरावर संगणक उपलब्ध करून देण्यात आले.

# परिवर्तन पॅनलच्या उमेदवारांनी घेतले अण्णांचे आशीर्वाद

## सैनिक बँक निवडणूक प्रचाराचा शुभारंभ



■ ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचा आशीर्वाद घेताना परिवर्तन पॅनलचे उमेदवार व इतर मान्यवर.

**राळेगणसिद्धी : प्रतिनिधी**

**पारनेर तालुका सैनिक सहकारी बँकेच्या परिवर्तन पॅनलच्या उमेदवारांनी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची राळेगणसिद्धी येथे भेट घेत प्रचाराचा शुभारंभ केला.**

यावेळी पॅनल प्रमुख दत्तात्रेय भुजबळ, आनंदा रणदिवे, विनायक गोस्वामी, संतोष राक्षे, निलेश तनपुरे, दीपक गायकवाड यांच्या सह कॅप्टन विठ्ठल वराळ, मारुती पोटघन,अरुण रोहकले, लक्ष्मण डोके,सुरेश लेकुरवाळे, पिंपरी जलसेन माजी सरपंच लहू थोरात उपस्थित होते.

या वेळी अण्णा हजारे म्हणाले की सैनिक बँक ही माजी सैनिकांनी स्थापन केली असून बँकेची बिनविरोध निवडणूक व्हायला पाहिजे होती परंतु लोकशाहीत सर्वांना अधिकार असल्याने काही जागा बिनविरोध झाल्या नसल्या तरी उर्वरित संचालक पदासाठी स्वच्छ प्रतिमा असलेले लोक संचालक म्हणून बँकेत जाणे गरजेचे असल्याचे मत अण्णा हजारे यांनी व्यक्त केले.

या वेळी परिवर्तन पॅनल प्रमुख दत्तात्रय भुजबळ म्हणाले की आम्ही सर्वसामान्य उमेदवार असून आमचा विरोधी पॅनलचे प्रमुख शिवाजी व्यवहारे यांनी बँकेत चालवलेली हुकमशाही मोडीत काढण्यासाठी आरक्षित जागेवर आम्ही उमेदवाऱ्या केल्या आहेत. जनरल सर्वसाधारण जागे बाबत आमचा विरोध नव्हताच.त्यामुळे नेते मंडळींनी केलेल्या आव्हानाला आम्हीही साथ दिली. मात्र आरक्षित जागेबाबत सत्ताधारी पॅनल प्रमुखाने आडमुठी भूमिका स्वीकारली परिणामी आम्हालाही त्यांच्या विरोधात उभे राहणे भाग पडले असल्याचे स्पष्टीकरण दत्तात्रय भुजबळ यांनी पत्रकारांशी बोलताना दिले.

# शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी सेवा सोसायट्यांच्या प्रयत्नांची गरज

## ■ जिल्हा सहकारी बँकेच्या योजनांचा फायदा घ्या ■ जिल्हा बँक संचालिका गीतांजली शेळके यांचे आवाहन

**निघोज : प्रतिनिधी**

**शेतकरी बांधव सक्षम होण्यासाठी सेवा सोसायटींनी जिल्हा सहकारी बँकेच्या योजनांचा लाभ घेण्याची गरज असल्याचे प्रतिपादन जिल्हा सहकारी बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांनी व्यक्त केले आहे.**



श्रीमती शेळके यांनी राळेगण थेरपाळ सोसायटीला सदिच्छा भेट दिली यावेळी सोसायटीचे चेअरमन सचिन कारखिले यांनी त्यांचा सत्कार केला यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी सोसायटीचे उपाध्यक्ष अशोक कारखिले, उपसरपंच नरेश सोनवणे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष शशिकांत कारखिले, संचालक संदीप डोमे, माजी उपाध्यक्ष विलास कारखिले, मुंबई बँकेचे अधिकारी सुभाष खणकर, संदीप कारखिले, शशिकांत कारखिले, मयुर कारखिले, सतिश गाडीलकर आदी मान्यवर तसेच सभासद शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्रीमती शेळके यावेळी म्हणाल्या जिल्हा सहकारी बँकेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात योजना आहेत त्या योजनांची माहिती घेऊन त्या शेतकऱ्यांना देण्यासाठी पदाधिकारी व संचालक मंडळाने प्रयत्नशील राहण्याची गरज आहे तसेच सोसायटी माध्यमातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी परिसंवाद आयोजित केल्यास योजना शासकीय असोत की इतर त्यांची माहिती होउन शेतकरी आर्थिक दृष्ट्या सक्षम होण्यासाठी पाठबळ मिळेल. या सोसायटीची वसुली चांगली असून अशाप्रकारे काम केल्यास याचा फायदा सोसायटी बरोबरच शेतकऱ्यांना होईल अशी अपेक्षा श्रीमती शेळके यांनी व्यक्त केली.

# हरेश्वर देवस्थान ट्रस्टच्या अध्यक्षपदी शिवाजी शिर्के;उपाध्यक्षपदी दत्तात्रय आंधळे यांची निवड

**कर्जुले हर्या : प्रतिनिधी**

**येथील राज्यस्तरीय क वर्ग दर्जा प्राप्त तिर्थक्षेत्र श्री हरेश्वर देवस्थान ट्रस्टच्या विविध पदाधिकारी निवडी पार पडल्या आहेत.अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार शिवाजी शिर्के,उपाध्यक्षपदी दत्तात्रय आंधळे,सचिवपदी एकनाथ दाते,सहसचिवपदी बाळासाहेब विठ्ठल उंडे,खजिनदारपदी बाबासाहेब उंडे यांची निवड करण्यात आली आहे.**

देवस्थान ट्रस्टच्या पदाधिकार्यांची मुदत संपत असल्याने नवे विश्वस्त मंडळ निवडण्यासाठी संस्थेचे मावळते अध्यक्ष बबन शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली सभासद व ग्रामस्थांची वार्षिक सभा नुकतीच मंदिरात घेण्यात आली. या सभेत मंदिर जिर्णोद्धार कामाचा आढावा घेण्यात आला.

संस्थेचे मावळते सचिव शिवाजी शिर्के यांनी कामाचा आढावा घेतानाच झालेल्या जमाखर्चाचा आढावा सादर केला.मंदिर जिर्णोद्धार काम आणि मंदिर परिसरात क वर्ग तिर्थक्षेत्र योजनेतून करण्यात येणार्या कामांबाबत माहिती दिली.





संस्थेच्या संचालक मंडळावर बबन शिर्के,लहू मुळे,प्रमोद कोकाटे, डॉ.विलास जाधव,गोरक्ष वाफारे,ज्ञानदेव शिंदे,शशिकांत आंधले,संतोष हुळवळे,सीताराम उंडे, बाळासाहेब आंधळे,बाबाजी आंधळे,संदीप आंधळे,गंगाराम उंडे यांची निवड करण्यात आली.

ग्रामस्थ व देणगीदारांच्या आर्थिक मदतीने भगवान श्री.शंकराचे सुमारे पावणे पाच कोटी रुपये खर्चुन मंदिर उभारण्यात आले आहे. याशिवाय मंदिराच्या परिसरात विद्युत रोषणाईयुक्त गार्डन आणि आकर्षक असा कारंजा देखील उभारण्यात आला आहे.

# कोरठणला बुधवारी संत गगनगिरी महाराजांचा पुण्यतिथी सोहळा

## विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**पिंपळगाव रोठा : प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे कुलदैवत असलेल्या पिंपळगाव रोठा येथील श्री क्षेत्र कोरठण खंडोबा देवस्थान या तीर्थक्षेत्रावर बुधवारी (दि.७) रोजी ब्रह्मलीन परमपूज्य संत श्री स्वामी गगनगिरी महाराज यांचा (समाधी दिवस)पुण्यतिथी सोहळ्याचे व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन देवस्थान,भाविक,भक्त व ग्रामस्थांनी केले आहे.**

ब्रह्मलीन परमपूज्य श्री स्वामी गगनगिरी महाराज हे तपस्वी, हटयोगी व सिद्ध पुरुष महात्मा होते कोल्हापूर जवळ गगनबावडा येथील गगनगडावर गुहेत महाराजांचे शक्तिपीठ व तपस्थान आहे. तसेच फोंडा घाटातील दाजीपूर येथील अभयारण्यात माऊली कुंड, झांजूचे पाणी इत्यादी महाराजांचे तपस्थाने आहेत खोपोली येथील योगाश्रमात श्री महाराजांची समाधी आहे.

सन १९९७ शुद्ध चंपाषष्ठीला श्री गगनगिरी महाराजांचे शुभ हस्ते श्री कोरठण खंडोबा पुरातन मंदिराचा जीर्णोद्धार पूर्ण होऊन सुवर्णकलशावरोहण झाले होते. त्या सोहळ्याला तीन लाखापेक्षा जास्त भाविक भक्त उपस्थित होते. त्यानंतर सलग ५ वर्ष महाराज चंपाषष्ठी महोत्सवाला उपस्थित राहून भाविक भक्तांना दर्शन व आशीर्वाद देत असत. तेव्हापासून श्री कोरठण खंडोबाचे महात्म्य व वैभव वाढत राहिले. श्री महाराजांनीच सुवर्णकलशा रोहणासाठी सांगितलेला शुद्ध चंपाषष्ठीचा मुहूर्त आणि त्यानुसार देवस्थानच्या इतिहासात सुरू झालेला चंपाषष्ठीचा महोत्सव हा महाराजांचा आशीर्वाद व अमूल्य ठेवा असल्याचे भाविक भक्त मानतात.



सन २०१६ साली शुद्ध चंपाषष्ठीला श्री कोरठण खंडोबा देवस्थान जवळ श्री खंडोबा म्हाळसा घोड्यावरील पितळी मूर्तीच्या मंदिराखाली ध्यानमंदिर तयार करून त्यामध्ये देवस्थान तर्फे ब्रह्मलीन प.पू. श्री गगनगिरी महाराज यांची सुरेख मार्बल मधील मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली त्यानंतर सन २०१७ पासून श्री महाराजांचा समाधी दिवस पौष कृ.१२ प्रदोष देवस्थान भाविक भक्तातर्फे साजरा करण्यात येऊ लागला.

यावर्षी बुधवार दि.७ फेब्रुवारी २०२४ रोजी महाराजांचे पुण्यतिथी सोहळ्याचे नियोजन धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्याचे आयोजन करण्यात आले आहे. स. ६ वा. अभिषेक पूजा, स.७ वा. होमहवन, स.९ वा. श्री गगनगिरीजी महाराज प्रतिमेची दिंडी सोहळ्यात कोरठण गड प्रदक्षिणा मिरवणूक निघेल. यामध्ये जय मल्हार विद्यालय, श्री खंडेश्वर वारकरी शिक्षण संस्था विद्यार्थी, ग्रामस्थ, भक्त सहभाग राहील सकाळी १०.३० वा . आकाश महाराज घोलप यांचे संगीत प्रवचन होणार आहे नंतर महाप्रसाद अन्नदान जय गगनगिरी सेवाभावी मंडळ आणि श्री संकल्प संजय विश्वासराव परिवार बेल्हे यांचे तर्फे महाप्रसाद नियोजन आहे.

दुपारी १ वा. भजन, गायन होईल याप्रमाणे सर्व कार्यक्रमांचा भक्तांनी लाभ घ्यावा असे निवेदन अध्यक्षा शालिनी घुले, उपाध्यक्ष महेश शिरोळे, माजी अध्यक्ष व विद्यमान विश्वस्त अॅड. पांडुरंग गायकवाड, सचिव जालिंदर खोसे, खजिनदार तुकाराम जगताप, सहसचिव कमलेश घुले, विश्वस्त रामदास मुळे, चंद्रभान ठुबे, राजेंद्र चौधरी, धोंडीभाऊ जगताप, महादेव पुंडे, सुवर्णा घाडगे, सुरेश फापाळे, दिलीप घुले, अजित महांडूळे, समस्त ग्रामस्थ यांनी केले आहे.

# ग्रामीण विद्यार्थी संधीचे सोनं करतात !

## गीतांजली शेळके यांचे प्रतिपादन

**निघोज : प्रतिनिधी**

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना संधी मिळाल्यास ते संधीचे सोने करतात असा अनुभव सध्या येत असून शैक्षणिक गुणवत्तेत ग्रामीण भागातील विद्यार्थी नंबर एक असल्याचे प्रतिपादन जिल्हा सहकारी बँक व जी एस महानगर बँकेच्या संचालिका गीतांजली शेळके यांनी व्यक्त केले.**



महाराष्ट्र राज्य शासकीय रेखा कला परीक्षा २०२३-२४ मध्ये ग्रामीण बहुउद्देशीय माध्यमिक विद्यालय पिंपरी जलसेन येथील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून कुमारी सदिच्छा संदीप जाधव हिने राज्यस्तरीय गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवून उत्तुंग यश संपादन केले.२०२३-२४ मध्ये विद्यालयाचे २१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते यापैकी ६ विद्यार्थी ए ग्रेड मध्ये १० विद्यार्थी बी ग्रेड मध्ये व ५ विद्यार्थी सी ग्रेड मध्ये आले या विद्यार्थ्यांच्या ग्रेडचे अतिरिक्त गुण इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेमध्ये घेतले जातात.

या विद्यार्थ्यांना विद्यालयाचे शिक्षक विजय पठारे व एकनाथ पोटे यांचे बहुमोल असे मार्गदर्शन लाभले .सदिच्छाच्या या यशाबद्दल अहमदनगर जिल्हा बँकेच्या संचालिका श्रीमती गीतांजली शेळके यांनी विद्यालयात येऊन कौतुक केले यावेळी गावचे ज्येष्ठ सेवानिवृत्त पोलीस अधिकारी अनिल वाढवणे,नेरूळ तालुका काँग्रेस अध्यक्ष तुकाराम कदम,मुंबई सहकारी बँकेचे अधिकारी सुभाष खणकर,ज्ञानदेव वाढवणे पाटील विद्यालयाचे शिक्षक दादाभाऊ बोरुडे,लैला शेख, चंद्रशेखर ठुबे शैलेंद्र गायकवाड, गणेश पुणेकर उपस्थित होते.

यावेळी बोलताना श्रीमती शेळके यांनी विद्यार्थ्यांना कलाक्षेत्रातील विविध करिअरच्या संधी व त्याचे होणारे फायदे याची माहिती दिली तसेच या परीक्षेसाठी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा अशी इच्छा व्यक्त केली या क्षेत्रामध्ये विविध ठिकाणी कार्यरत असणाऱ्या व्यक्तींची मुलाखत विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्याचे सांगितले.

सदिच्छाच्या या यशाचे संपूर्ण तालुक्यात कौतुक होत असून मुख्याध्यापक विलास सपकाळ , पिंपरी जलसेनचे सरपंच सुरेश काळे, उपसरपंच वर्षाताई पानमंद तसेच अहमदनगर जिल्हा कलाशिक्षक संघाचे अध्यक्ष संजय पठाडे, पारनेर तालुका कला संघटनेचे अध्यक्ष कानिफनाथ गायकवाड ,मंगेश काळे,कैलास विटनोर ,प्रसिद्ध चित्रकार ज्ञानेश्वर कवडे,संतोष कवडे ,वाळुंज ,संजय खोडदे , साहेबराव घुले व सर्व कला शिक्षकांनी अभिनंदन केले आहे.

# शेवती, पुरणपोळी, मोदक आणि मसावडीही!

## ■ पारनेर पब्लिकमध्ये महाराष्ट्राच्या खाद्य संस्कृतीचे दर्शन ■ विविध सणांच्या माध्यमातून राज्याच्या परंपरेलाही उजाळा

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर शहरातील पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्समध्ये महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडले. महाराष्ट्रात साजऱ्या होणाऱ्या विविध पारंपारीक सणांना उजाळा देत राज्यात प्रसिध्द असलेली शेवती, पिठलं भाकरी, दिवाळी फराळ, पुरणपोळी, मोदक, मासवडी, खिचडी, नारळी भात, लापशी आणि श्रीखंडपुरीच्या बेताने महाराष्ट्राचा सांस्कृतीक वारसा जपला गेला.**




■ विविध खाद्य पदार्थ तसेच महाराष्ट्राचा सांस्कृतीक वारसा सांगणारे पेहराव करीत पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडविले.

पारनेर पब्लिक स्कुलच्या इयत्ता १ ली ते ४ थी च्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या सहकार्यातून छत्रपती शिवाजी महाराज, माँ जिजाऊ, संत गाडगे महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सारख्या अनेक थोर पुरूषांच्या वेशभुषा करीत महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन घडविले. ग्रामीण जीवनाची तसेच शेतकऱ्याची ओळख करून देणारा बैल पोळा, भावा बहिणीचे प्रतिक असलेले रक्षाबंधन, कोळी बांधवांचे समुद्राविषयी प्रेम व्यक्त करणारी नारळी पोर्णिमा, गणेशोत्सव, अंधाराकडून प्रकाशाकडे घेऊन जाणारी दिपावली, मराठी नव वर्षाची सुरूवात दाखविणारा गुढी पाडवा, मकर संक्रांत, होळी, संत परंपरा जपणारी आषाढी कार्तिकी एकादशी यांसारख्या विविध सण साजरे करण्यात येऊन त्या निमित्त महाराष्ट्रातील विविध प्रसिध्द खाद्य पदार्थांची मेजवानीही देण्यात आली. विद्यार्थ्यांनी विविध पदार्थ शाळेत घेउन येत या उपक्रमात मोठया उत्साहाने सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेच्या अध्यक्षा सविता म्हस्के, नीलेशा पवार, केतकी पवळे, सुनीता खोडदे, प्रियंका कुलकर्णी, वनिता रेपाळे, विजया लांडे, वर्षा फसले, योगेश पिसे यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष प्रयत्न केले.

### राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश

या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक जाती पंथांचे पेहराव परिधानकरीत आम्ही पेहरावाने जरी भिन्न असलो तरी महाराष्ट्रात गुण्यागोविंदाने राहतो हे कृतीतून दाखवून दिले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय एकात्मतेचा संदेशही दिला.

**गिताराम म्हस्के**, संस्थापक, पारनेर पब्लिक स्कुल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com